सत्यमेव जयते

# THE MEMBERS OF MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (DISQUALIFICATION ON GROUND OF DEFECTION) RULES, 1986

(Alongwith Extracts of Relevant Constitutional Provisions)

*Fourth Edition 2020*

# महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६

(संविधानातील संबंधित तरतुदींच्या उताऱ्यांसह)

**चौथी आवृत्ती, २०२०**




MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

Vidhan Bhavan, Mumbai 400 032

**2020`**

# महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
# (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता)
# नियम, १९८६

(संविधानातील संबंधित तरतुदींच्या उता-यांसह)

## चौथी आवृत्ती, २०२०

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई ४०० ०३२

एचबी २४१२-१

# प्रस्तावना

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६ या पुस्तकाची ही चौथी आवृत्ती आहे.

भारताच्या संविधानाच्या दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद ८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापतींनी "महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६" तयार केले आहेत. उक्त नियम या पुस्तिकेत अंतर्भूत केले असून यात संदर्भासाठी भारताच्या संविधानातील सदस्यांच्या निरर्हतेसंबंधातील उतारा तसेच संविधानाच्या दहाव्या अनुसूचीच्या संविधानाच्या एक्याण्णव्या घटना दुरुस्तीद्वारे केलेल्या सुधारणासहित अंतर्भाव केलेला आहे. विधानपरिषद सदस्यांना हे प्रकाशन उपयुक्त होईल अशी आशा आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १ जानेवारी, २०२०.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

## MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

Vidhan Bhavan, Bombay 400 032, dated the 8th August 1986

*NOTIFICATION*

No. 26947/E-1.— The following Rules which have been made under paragraph *8* of the Tenth Schedule to the Constitution of India and placed on the Table of the Maharashtra Legislative Council on 16th June, 1986 and which have become effective from 16th July, 1986 are published for general information :—

### THE MEMBERS OF MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (DISQUALIFICATION ON GROUND OF DEFECTION) RULES, 1986.

In exercise of the powers conferred by paragraph 8 of the Tenth Schedule to the Constitution of India, the Chairman, Maharashtra Legislative Council, hereby makes the following rules, nemely :—

1. *Short Title*— These rules may be called the Members of Maharashtra Legislative Council (Disqualification on ground of Defection) Rules, 1986.

2. *Definitions*— In these rules, unless the context otherwise requires,

(*a*) " Bulletin " means the Bulletin of the Maharashtra Legislative Council.

(*b*) " Committee " means the Committee of Privileges of the Maharashtra Legislative Council.

(c) " Council " means the Maharashtra Legislative Council.

(*d*) " Form " means a form appended to these rules.

(*e*) " date of commencement ", in relation to these rules, means the date on which these rules take effect under sub-paragraph (2) of paragraph 8 of the Tenth Schedule.

(*f*) " leader " in relation to a legislature party, means a member of the *party* chosen by it as its leader and includes any other member of the party authorised by the party to act in the absence of the leaders as, or discharge the functions of, the leader of the party for the purposes of these rules.

(g) " member " means a member of the Maharashtra Legislative Council.

(*h*) " Tenth Schedule " means the Tenth Schedule to the Constitution of India.

(*i*) " Secretary " means the Secretary to the Maharashtra Legislative Council and includes any person for the time being performing the duties of the Secretary.

3. *Information to be furnished by leader of a legislature party*— (1) The leader of each legislature party (other than a separate legislature party consisting of only one member) shall, within thirty days from the date of commencement of these rules or, where such legislature party *is* formed after such date, within thirty days from the date of its formation, or, in either case, within such further period as the Chairman may for sufficient cause allow, furnish the following to the Chairman, namely :—

(*a*) a statement (in writing) containing the names of members of such legislature party together with other particulars regarding such members as in Form-I, and the names and designations of the members of such party who have been authorised by it for communicating with the Chairman for purposes of these rules ;

(*b*) a copy of the rules and regulations (whether known as such or a constitution or by any other name) of the political party concerned ; and

(*c*) where such legislature party has any separate set of rules and regulations (whether known as such or as constitution or by any other name), also a copy of such rules and regulations.

(2) Where a legislature party consists of only one member, such member shall furnish a copy of the rules and regulations mentioned in clause (*b*) of sub-rule (1) of the Chairman witliin thirty days from the date of commencement of these rules or, where he has become a member of the Council after such date, within thirty days from the date on which he has taken his seat in the Council or, in either case, within such further period as the Chairman may for sufficient cause allow.

(3) In the event of any increase in the strength of a legislature party consisting of only one member, the provisions of sub-rule (1) shall apply in relation to such legislature party as if such legislature party had been formed on the first date on which its strength increased.

(4) Whenever any change takes place in the information furnished by the leader of a legislature party under sub-rule (1) or by a member under sub-rule (2), he shall as soon as may be thereafter and in any case within

thirty days from the date on which such change has taken place or within such further period as the Chairman may for sufficient cause allow, furnish in writing information to the Chairman with respect to such change.

(5) Where a member belonging to any political party votes or abstains from voting in the Council contrary to any direction issued by such political party or by any person or authority authorised by it in this behalf, without obtaining, in either case, the prior permission of such political party, person or authority, the leader of the legislature party concerned or ; where such member is the leader, or as the case may be, the sole member of such legislature party, such member, shall as soon as may be thereafter and in the case within thirty days from the date of such voting or abstention, inform the Chairman as in Form-II whether such voting or abstention has or has not been condoned by such political party, person or authority.

*Explanation.*— A member may be regarded as having abstained from voting only when he, being entitled to vote voluntarily refrained from voting.

4. *Information etc. to be furnished by members*— (1) Every member who has taken his seat in the Council before the date of commencement of these rules shall furnish to the Secretary within thirty days from such date or. within such further period as the Chairman may for sufficient cause allow, a statement of particulars and declaration as in Form III.

(2) Every member who takes his seat in the Council after the commencement of these rules shall, before making and subscribing an oath or affirmation under article 188 of the Constitution and taking his scat in the Council, deposit with the Secretary his election certificate or, as the case may be, a certified copy of the notification nominating him as a member and also furnish to the Secretary a statement of particulars and declaration as in Form III.

*Explanation.*— For the purposes of this sub-rule, " Election Certificate " means the certificate of election issued under the Representation of the People Act, 1951 (43 of 1951) and the rules made thereunder.

(3) A summary of the information furnished by the members under this rule shall be published in the Bulletin and if any discrepancy therein is pointed out to the satisfaction of the Chairman, necessary corrigendum shall be published in the Bulletin.

5. *Register of information as to members*— (1) The Secretary shall maintain, as in Form IV register based on the information furnished under rule 3 and 4 in relation to the members.

(2) The information in relation to each member shall he recorded on a separate page in the register.

6. *Reference to be made by petitions*— (1) No reference of any question as to whether a member has become subject to disqualification under the Tenth Schedule shall be made except by a petition in relation to such member made in accordance with the provisions,of this rule.

(2) A petition in relation to a member may be made in writing to the Chairman by any other member.

(3) Before making any petition in relation to any member, the petitioner shall satisfy himself that there are reasonable grounds for believing that a question has arisen as to whether such member has become subject to disqualification under the Tenth Schedule.

(4) Every petition,—

(*a*) shall contain a concise statement of the material facts on which the petitioner relies ; and

(*b*) shall be accompanied by copies of the documentary evidence, if any, on which the petitioner relies and where the petitioner relies on any information furnished to him by any person, a statement containing the names and addresses of such persons and the gist of such information as furnished by each such person.

(5) Every petition shall be signed by the petitioner and verified in the manner laid down in the Code of Civil Procedure , 1908 (5 of 1908) for the verification of pleadings.

(6) Every annexure to the petition shall also be signed by the petitioner and verified in the same manner as the petition.

7. *Procedure*— (1) On receipt of a petition under rule 6, the Chairman shall consider whether the petition complies with the requirements of that rule.

(2) If the petition does not comply with the requirements of rule 6, the Chairman shall dismiss the petition and intimate the petitioner accordingly.

(3) If the petition complies with the requirements of rule 6, the Chairman shall cause copies of the petition and of the annexures thereto to be forwarded,—

(*a*) to the member in relation to whom the petition has been made, and

(b) where such member belongs to any legislature party and such petition has not been made by the leader thereof, also to such leader,

and such member or leader shall within seven days of the receipt of such copies, or within such further period as the Chairman may for sufficient cause allow, forward his comments in writing thereon to the Chairman.

(4) After considering the comments, if any, in relation to the petition, received under sub-rule (*3*) within the period allowed (whether originally or on extension under that sub-rule), the Chairman may either proceed to determine the question or, if he is satisfied, having regard to the nature and circumstances of the case that it is necessary or expedient so to do, refer the petition to the committee for making a preliminary inquiry and submitting a report to him.

(5) The Chairman shall, as soon as may be after referring a petition to the Committee under sub-rule (4), intimate the petitioner accordingly and make an announcement with respect to such reference in the House or, if the House is not then in session, cause the information as to the reference to be published in the Bulletin .

(6) Where the Chairman make a reference under sub-rule (*4*) to the Committee, he shall proceed to determine the question as soon as may be after receipt of the report from the Committee .

(7) The procedure which shall be followed by the Chairman for determining any question and the procedure which shall be followed by the Committee for the purpose of making a preliminary inquiry under sub-rule (*4*) shall be, so far as may be, the same as the procedure applicable for the determination by the Committee of any of any question as to breach of privilege of the Council by a member, and neither the Chairman nor the Committee shall come to any finding that a member has become subject to disqualification under the Tenth Schedule without affording a reasonable opportunity to such member to represent his case to be heard in person.

8. *Decision of petitions*— (1) At the conclusion of the consideration of the petition, the Chairman shall by order in writing,—

(*a*) dismiss the petition, or,

(*b*) declare that the member in relation to whom the petition has been made has become subject to disqualification under the Tenth Schedule,

and cause copies of the order to be delivered or forwarded to the petitioner, the member in relation to whom the petition has been made and the leader of the legislature party, if any, concerned.

(2) Every decision declaring a member to have become subject to disqualification under the Tenth Schedule shall be reported to the Council forthwith if the Council is in session, and if the Council is not in sesssion immediately after the Council reassembles.

(3) Every decision referred to in sub-rule (*1*) shall be published in the Bulletin and notified in the *Official Gazette* and copies of such decision shall be forwarded by the Secretary to the Election Commission of India and the Chief Electoral Officer, Maharashtra State.

9. ***Directions as to detailed working of these rules***— The Chairman may, from time to time, issue such directions as he may consider necessary in regard to the detailed working of these rules.

# FORM I

[*See* Rule 3 (1)]

Name of the Legislature Party :

Name of the corresponding political party :

| Serial No. | Name of the Member (in block letters) | Father's/ Husband's Name | Permanent Address | Name of the Constituency from which elected |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | |

Date :

Signature of Leader of the Legislature Party.

## FORM II

[*See* Rule 3 (5)]

To

The Chairman,
Maharashtra Legislative Council

Sir,

At the sitting of the Council held on ............................................ (date) during voting on ............................................................. (Subject-matter)

| *Shri ............................................ M.L.C. member of ........................ ........................................................ (Name of the political party) and member of ...................................... ............. (name of the legislature party) had voted/abstained from voting. | *I ................................................... (Name of the Member) M.L.C. Member of ...................................... (Name of the political party) and leader of/sole member of ............................... (Name of the legislature party) voted/abstained from voting. |
|---|---|

contrary to the direction issued by ........................................................... **(* person/authority/party without obtaining the prior permission of the said *person/authority/party.

2. On (date) .................................................. the aforesaid matter was considered by ........................................................................ **(* person/ authority/party) and the said voting*/abstention was condoned*/was not condoned by him*/it.

Your's fatihfully,

Date :

(Signature)

---

*Strike out in appropriate words/portion.

**Here mention the name of the person/authority/party, as the case may be who had issued the direction.

## FORM III

(*See* Rule 4)

1. Name of the member (in block letters) :
2. Father's/Husband's Name :
3. Permanent Address :
4. Date of election/nomination :
5. Party affiliation as on— :
   (i) date of election/nomination
   *(ii) the 28th February 1986 :
   (iii) date of signing this form :

## DECLARATION

I, ................................................................................................ hereby declare that the information given above is true and correct.

In the event of any change in the information above, I undertake to inform the Chairman immediately.

Date :

Signature/Thumb
Impression of Member

*To be filled in by members elected or nominated before the 1st March 1985, being the date of commencement of the Constitution (52nd Amendment) Act, 1985.

## FORM IV

[*See* Rule 5 (1)]

| Name of the Members (in block letters) | Father's/ husband's name | Permanent Address | Name of the Constituency from which elected | Date of Election nomination | Date of taking seat in the Council | Date of commencement of term of office | Name of political party to which he belongs | Name Legislature party to which he belongs | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| | | | | | | | | | |

Principal Secretary,
Maharashtra Legislative Council

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांकित ८ ऑगस्ट, १९८६

## अधिसूचना

क्रमांक २६९४७/ई-१.—भारताच्या संविधानाच्या दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद-८ द्वारे तयार करण्यात आलेले आणि दिनांक १६ जून, १९८६ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आलेले आणि जे दिनांक १६ जुलै, १९८६ पासून अंमलात आलेले आहेत असे पुढील नियम सर्वसाधारण माहितीकरिता प्रसिद्ध केले आहेत.

## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६

भारताच्या संविधानाच्या दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद ८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, याद्वारे, पुढील नियम करीत आहेत :—

**१. संक्षिप्त नाव**—या नियमांस ' महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६ ' असे म्हणावे.

**२. व्याख्या**—या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " बुलेटीन " म्हणजे, महाराष्ट्र विधानपरिषदेचे बुलेटिन ;

(ब) " समिती " म्हणजे, महाराष्ट्र विधानपरिषदेची विशेषाधिकार समिती ;

(क) " विधानपरिषद " म्हणजे, महाराष्ट्र विधानपरिषद ;

(ड) " नमुना " म्हणजे, या नियमांसोबत जोडलेला नमुना ;

(ई) " प्रारंभाचा दिनांक " याचा या नियमाच्या संदर्भातील अर्थ, दहाव्या अनुसूचीचा परिच्छेद ८, उप परिच्छेद (२) अन्वये हे नियम ज्या दिनांकासा अंमलात येतील तो दिनांक असा होतो ;

(फ) " नेता " याचा, विधानमंडळ पक्षाच्या संबंधातील अर्थ, त्या पक्षाचा सदस्य असलेली व त्या पक्षाने आपला नेता म्हणून निवडून दिलेली व्यक्ती असा असून त्यामध्ये, या नियमाच्या प्रयोजनासाठी त्या पक्षाने नेत्याच्या अनुपस्थितीत नेता म्हणून काम करण्यास किंवा पक्ष नेत्यांनी कामे पार पाडण्यास ज्यास प्राधिकृत केले असेल असा पक्षाचा अन्य कोणताही सदस्य, यांचा समावेश होतो ;

(ग) " सदस्य " म्हणजे, महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य ;

(ह) " दहावी अनुसूची " म्हणजे, भारताच्या संविधानाची दहावी अनुसूची ;

(आय) " सचिव " म्हणजे महाराष्ट्र विधानपरिषदेचा सचिव व त्यामध्ये त्या त्या वेळी सचिवाची कर्तव्ये पार पाडण्या-या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

**३. विधानमंडळ पक्षाच्या नेत्याने पुरवावयाची माहिती—** (१) (ज्यात केवळ एकच सदस्य असेल असा विधानंडळ पक्ष वगळता) प्रत्येक विधानमंडळ पक्षाचा नेता, या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा, असा विधानमंडळ पक्ष अशा दिनांकानंतर अस्तित्वात आला असल्यास, तो अस्तित्वात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, किंवा यापैकी कोणत्याही प्रकरणी, सभापती, पुरेशा कारणावरून मुभा देईल अशा आणखी कालावधीत सभापतीस पुढील माहिती पुरवील :——

(अ) अशा विधानमंडळ पक्षाच्या सदस्यांची नावे व नमुना एक मध्ये दिल्याप्रमाणे अशा सदस्यां-संबंधीचा इतर तपशील देणारे (लेखी) निवेदन व या नियमांच्या प्रयोजनांसाठी सभापतींशी संपर्क साधण्याकरिता, पक्षाने प्राधिकृत केलेल्या, अशा पक्षाच्या सदस्यांची नावे व पदनामे ;

(ब) संबंधित राजकीय पक्षाचे नियम व विनियम (मग ते त्या नावाने ओळखण्यात येत असोत किंवा घटना म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असोत) यांची एक प्रत ; आणि

(क) अशा विधानमंडळ पक्षाचे नियम व विनियम (त्या नावाने घटना म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे) यांचे कोणतेही स्वतंत्र संच असल्यास, अशा नियम व विनियमांची एक प्रत.

(२) विधानमंडळ पक्ष केवळ एकाच सदस्याचा मिळून बनलेला असेल त्याबाबतीत, असा सदस्य, या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, किंवा तो अशा दिनांकानंतर विधानपरिषद सदस्य झाला असल्यास त्याने विधानपरिषदेत आपले पद धारण केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा त्यापैकी कोणत्याही प्रकरणी, सभापतींनी पुरेशा कारणावरून मुभा दिली असेल अशा आणखी मुदतीत पोट-नियम (१) च्या खंड (ब) मध्ये उल्लेखिलेले नियम व विनियम यांची एक प्रत सभापतीस सादर करील.

(३) केवळ एकच सदस्य असलेल्या विधामंडळ पक्षाच्या संख्याबळ कोणतीही वाढ झाल्यास त्याबाबतीत, ज्या दिनांकाला त्या पक्षाचे संख्याबळ वाढले त्याच दिनांकाला तो पक्ष अस्तित्वात आला असल्याप्रमाणे पोट-नियम (१) च्या तरतुदी अशा विधानमंडळ पक्षाच्या संबंधात लागू होतील.

(४) पोट-नियम (१) अन्वये विधानमंडळ पक्षाच्या नेत्याने पुरविलेल्या किंवा पोट-नियम (२) अन्वये एखाद्या सदस्याने पुरविलेल्या माहितीत कोणताही बदल झाल्यास, तो त्यानंतर शक्य तितक्या लवकर व कोणत्याही प्रकरणी, असा बदल झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा सभापती, पुरेशा कारणावरून मुभा देईल अशा आणखी मुदतीत, अशा बदलासंबंधाची माहिती सभापतीस लेखी सादर करील.

(५) कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य जेव्हा अशा राजकीय पक्षाने किंवा त्या पक्षाने याबाबतीत प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या निदेशाविरुद्ध मत देण्याच्या किंवा मत देण्याचे वर्जिण्याच्या बाबतीत असा राजकीय पक्ष, व्यक्ती किंवा प्राधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय विधानपरिषदेत मतदान करील किंवा मत देण्याचे वर्जित करील किंवा संबंधित राजकीय व पक्षाचा नेता किंवा यथास्थिती असा सदस्य हाच नेता असेल किंवा अशा विधानमंडळ पक्षाचा एकमेव सदस्य असेल त्याबाबतीत अशा सदस्य, त्यानंतर शक्य तितक्या लवकर व कोणत्याही प्रकरणी अशा मतदानाच्या किंवा वर्जनाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, सभापतीस असे मतदान किंवा वर्जन अशा राजकीय पक्षाने, व्यक्तीने किंवा प्राधिकाऱ्याने क्षमापित केले आहे किंवा नाही याबाबत नमुना दोनमध्ये दिल्याप्रमाणे कळवील.

**स्पष्टीकरण**—एखाद्या सदस्य, त्यास मतदानाचा हक्क असतानाही, स्वेच्छेने मतदान करण्याचे वर्जील त्या बाबतीतच केवळ त्याने मतदान करण्याचे वर्जीले असल्याचे समजण्यात येईल.

**४. सदस्याने सादर करावयाची माहिती, इत्यादी**—(१) या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी विधानपरिषदेत आपले पद धारण करणारा प्रत्येक सदस्य, अशा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा सभापती, पुरेशा कारणावरून मुभा देईल अशा पुढील मुदतीत नमुना तीनमध्ये असल्याप्रमाणे तपशिलाचे विवरण व घोषणापत्र सचिवास सादर करील.

(२) या नियमांच्या प्रारंभानंतर विधानपरिषदेत आपले पद धारण करणारा प्रत्येक सदस्य, संविधानाच्या अनुच्छेद १८८ अन्वये शपथ घेऊन व प्रतिज्ञाकथनावर स्वाक्षरी करून विधानपरिषदेत आपले पद ग्रहण करण्यापूर्वी सचिवांकडे आपले निवडणूक प्रमाणपत्र किंवा यथास्थिती, त्याला सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याऱ्या अधिसूचनेची एक प्रमाणित प्रत तसेच, नमुना तीनमध्ये असल्याप्रमाणे तपशिलाचे विवरण व प्रतिज्ञापत्र सादर करील.

**स्पष्टीकरण**—या पोट-नियमाच्या प्रयोजनाकरिता " निवडणूक प्रमाणपत्र " याचा अर्थ, " लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ " (१९५१ चा ४३) व त्याखाली करण्यात आलेले नियम याअन्वये देण्यात आलेले निवडणूक प्रमाणपत्र असा आहे.

(३) या नियमान्वये सदस्यांनी सादर केलेल्या माहितीचा गोषवारा बुलेटिनमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल व त्यामध्ये कोणतीही विसंगती असल्याचे सभापतींच्या निदर्शनास आणून देऊन त्याबद्दल त्यांची खात्री करून दिल्यास, आवश्यक ते शुद्धिपत्र बुलेटिनमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल.

**५. सदस्यांच्या संबंधातील माहिती विषयीची नोंदवही**—(१) सदस्यांच्या संबंधात नियम ३ व ४ अन्वये सादर करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे सचिव, नमुना चारमध्ये एक नोंदवही ठेवील.

(२) प्रत्येक सदस्यांच्या संबंधातील माहितीची नोंदवही स्वतंत्र पानावर नोंद करण्यात येईल.

**६. विनंती अर्जाद्वारे निर्देश करणे**—(१) अनुसूची दहा अन्वये सदस्य अनर्ह झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणताही निर्देश करण्यात येणार नाही. मात्र, या नियमाच्या तरतुदीनुसार अशा सदस्यांच्या संबधात विनंती अर्जाद्वारे असा निर्देश करण्यात आला असेल तर ती गोष्ट यास अपवाद राहील.

(२) एखाद्या सदस्याच्या संबंधातील विनंती अर्ज हा अन्य कोणत्याही सदस्यास सभापतीकडे लेखी करता येईल.

(३) कोणत्याही सदस्याच्या संबंधात विनंती अर्ज करण्यापूर्वी, विनंती अर्जदार असा सदस्य दहाव्या अनुसूची अन्वये अनर्ह झाला आहे किंवा कसे याबद्दल प्रश्न उपस्थित झाल्याचे समजण्यास वाजवी कारणे आहेत याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल.

(४) (अ) प्रत्येक विनंती अर्जात, विनंती अर्जादाराचा ज्या महत्त्वाच्या वस्तुस्थितीवर भर आहे त्याबद्दलचे संक्षिप्त निवेदन असेल, आणि

(ब) कोणत्याही कागदोपत्री पुरावा असल्यास तो प्रत्येक विनंती अर्जासोबत जोडण्यात येईल व विनंती अर्जदाराचा त्यास कोणत्याही व्यक्तीने पुरविलेल्या माहितीवर भर असेल त्याबाबतीत अशा व्यक्तींची नावे व पत्ते अशा प्रत्येक व्यक्तीने पुरविलेल्या अशा माहितीचा सारांश असलेले एक निवेदन अशा प्रत्येक विनंती अर्जासोबत जोडण्यात येईल.

(५) प्रत्येक विनंती अर्जावर विनंती अर्जदाराची स्वाक्षरी असेल व फिर्याद पडताळणीकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये घालून दिलेल्या रितीने त्याची पडताळणी करण्यात येईल.

(६) विनंती अर्जासोबत जोडलेल्या प्रत्येक जोडपत्रावर विनंती अर्जदार स्वाक्षरी करील व याची विनंतीअर्जदाराप्रमाणेच पडताळणी करण्यात येईल.

**(७) कार्यपद्धती**—(१) नियम ६ अन्वये विनंती अर्ज मिळाल्यावर, तो विनंती अर्ज त्या नियमाच्या आवश्यकता पूर्ण करतो किंवा नाही हे सभापती विचारात घेईल.

(२) विनंती अर्जात नियम ६ अन्वयेच्या आवश्यक गोष्टी पूर्ण करण्यात आल्या नसल्यास, सभापती तो विनंती अर्ज फेटाळून लावील व विनंती अर्जदारास तसे कळवील.

(३) विनंती अर्जात नियम ६ अन्वयेच्या आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या असल्यास सभापती विनंती-अर्जाच्या व त्यासोबत जोडलेल्या जोडपत्राच्या प्रती,—

(अ) ज्याच्या संबंधात असा विनंती-अर्ज करण्यात आला आहे अशा सदस्याकडे, आणि

(ब) असा सदस्य कोणत्याही विधानमंडळ पक्षाचा सदस्य असेल व असा विनंतीअर्ज त्या पक्षाच्या नेत्याने केलेला नसेल त्याबाबतीत त्या नेत्याकडेही पाठविण्याची व्यवस्था करील ;

आणि असा सदस्य किंवा नेता अशा प्रती त्यास मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत किंवा सभापती त्यास पुरेशा कारणावरून मुभा देईल अशा पुढील मुदतीत त्यावरील आपला अभिप्राय सभापतीस लेखी कळवील.

(४) पोट-नियम (३) अन्वये, अनुज्ञेय मदतीत (मग अशी मुदत मुळातच देण्यात आलेली असो वा त्या पोट-नियमान्वये वाढवून मिळालेली असो) मिळालेल्या विनंतीअर्जाच्या संबंधात कोणतेही अभिप्राय असल्यास त्यावर विचार केल्यानंतर सभापती एकतर त्या प्रश्नाचा निर्णय देण्याची कारवाई सुरू करील किंवा त्या प्रकरणाचे स्वरुप व परिस्थिती लक्षात घेता प्रारंभिक तपासणीसाठी तो विनंतीअर्ज समितीकडे पाठविणे इष्ट व आवश्यक आहे याबद्दल त्याची खात्री झाल्यास तो त्या समितीकडे अर्ज पाठवील व तिला तिचा अहवाल सादर करण्यास फर्मावील.

(५) सभापती, पोट-नियम (४) अन्वये, समितीकडे विनंतीअर्ज पाठविण्यात आल्यानंतर तद्नुसार शक्य होईल तितक्या लवकर, विनंतीअर्जदाराला त्याबाबत कळवील आणि सभागृहामध्ये अशा निर्देशाबाबत घोषणा करील किंवा जर सभागृहाचे अधिवेशन त्यावेळी चालू नसेल तर ती माहिती बुलेटिनमध्ये प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(६) पोट-नियम (४) अन्वये जेथे सभापती, समितीकडे अर्ज पाठवील तेथे, तो समितीकडून त्याबाबतचा अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर त्या प्रश्नावर निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करील.

(७) सभापतींकडून कोणत्याही प्रश्नाचा निर्णय घेण्यासाठी अनुसरली जाणारी कार्यपद्धती आणि पोट-नियम (४) अन्वये प्रारंक्षिक चौकशी करण्याच्या प्रयोजनाकरिता समितीकडून अनुसरली जाणारी कार्यपद्धती ही, शक्य होईल तेथवर, सदस्यांकडून सभागृहाच्या विशेषाधिकाराचा भंग करण्याच्या कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी समितीने करावयाच्या कार्यपद्धती प्रमाणेच असेल, आणि सभापती अथवा समिती या दोहोंपैकी कोणीही एक, अशा सदस्यास, त्याचे म्हणणे व्यक्तीशः सादर करण्याची वाजवी संधी मिळवून दिल्याशिवाय दहाव्या अनुसूची अन्वये सदस्य अनर्हतापात्र आहे अशा कोणत्याही निष्कर्षाप्रत येऊ शकणार नाही.

८. **विनंती अर्जावरील निर्णय**—(१) विनंती अर्जाचा विचार करून निष्कर्ष काढल्यानंतर, सभापती, लेखी आदेशाद्वारे—

(अ) विनंतीअर्ज फेटाळू शकेल, किंवा

(ब) ज्याच्या संबंधी विनंतीअर्ज करण्यात आला आहे तो सदस्य दहाव्या अनुसूचीस अधीन राहून अनर्ह आहे असे घोषित करू शकेल आणि विनंतीअर्जदार, ज्याच्यासंबंधी विनंतीअर्ज करण्यात आला आहे तो सदस्य व विधानमंडळ पक्षाचा, जर कोणीही संबंधित सदस्य व विधानमंडळ पक्षाचा, जर कोणीही संबंधित नेता असल्यास, त्यांना आदेशाच्या प्रती देण्याची किंवा पाठविण्याची व्यवस्था करील.

(२) दहाव्या अनुसूचीस अधीन राहून सदस्यास अनर्ह म्हणून घोषित करणारा प्रत्येक निर्णय, विधानपरिषदेचे अधिवेशन चालू असल्यास ताबडतोब विधानपरिषदेस कळविला पाहिजे व जर विधानपरिषदेचे अधिवेशन चालू नसेल तर त्यानंतर जेव्हा पुन्हा हे अधिवेशन भरेल, तेव्हा तत्काळ कळविला पाहिजे.

(३) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला प्रत्येक निर्णय बुलेटिनमध्ये प्रसिद्ध झाला पाहिजे व **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केला पाहिजे आणि अशा निर्णयाच्या प्रती, सचिवानी भारतीय निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविल्या पाहिजेत.

९. **या नियमानुसार करावयाच्या तपशीलवार कामकाजाबाबतचे निदेश**—या नियमानुसार करावयाच्या तपशीलवार कामकाजाच्या संबधात सभापती, त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे वळोवेळी निदेश देऊ शकेल.

## नमुना एक
[नियम ३ (१) पहा]

विधानमंडळ पक्षाचे नाव :

तत्सम राजकीय पक्षाचे नाव :

| अनुक्रमांक (१) | सदस्याचे नाव (२) | वडिलांचे/पतीचे नाव (३) | कायम पत्ता (४) | ज्या मतदार संघातून निवडून आला असेल त्या मतदार संघाचे नाव (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

दिनांक :

विधानमंडळ पक्षाच्या नेत्याची सही

(शा.म.मु.) एचबी २४१२-३ (२५०—२—२०२०)

# नमुना दोन

[नियम ३ (५) पहा]

प्रति,
सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

यांस,

महोदय,

.................................................................................... (विषय) यावर मतदान घेण्यासाठी (दिनांक) .......................................... रोजी भरलेल्या विधानपरिषदेच्या बैठकीत,

*श्री. ............................................ वि.प.स. ........................................ (राजकीय पक्षाचे नाव) चा सदस्य व ...................................................... (विधानमंडळ पक्षाचे नाव) चा सदस्य यांनी

*मी .................................................. (सदस्याचे नाव), वि.प.स. ..................... ......................... (राजकीय पक्षाचे नाव) चा सदस्य व .................................. (विधानमंडळ पक्षाचे नाव) चा नेता/एकमेव सदस्य यांनी

** ......................... (*व्यक्ती/प्राधिकारी/पक्ष) यांनी दिलेल्या निदेशाच्या उलट मतदान उक्त ................................ ची परवानगी न घेता केले/करण्यापासून परावृत्त राहिले. उक्त मतदान करणे/मतदान करण्यापासून परावृत्त राहणे हे त्या *व्यक्तीने/प्राधिका-याने/पक्षाने क्षमापित केले होते/*क्षमापित केले नव्हते.

२. (दिनांक) ........................................ रोजी पुर्वोक्त विषय, ................................ .................................. (व्यक्ती/प्राधिकारी/पक्ष) यांच्याकडून विचारात घेतला गेला व उक्त मतदान करणे/मतदान करण्यापासून परावृत्त राहणे याबाबतीत त्यांच्याकडून *क्षमा करण्यात आली/क्षमा करण्यात आलेली नाही.

आपला विश्वासू,

दिनांक :

(स्वाक्षरी)

*अयोग्य असलेला शब्द/मजकूर खोडून टाकावा.

**येथे यथास्थिती ज्याने निदेश दिले असतील त्या व्यक्तीचे/प्राधिका-याचे/पक्षाचे नाव नमूद करावे.

# नमुना तीन

[नियम ४ पहा]

१. सदस्याचे नाव (ठळक अक्षरात) :

२. वडीलांचे/पतीचे नाव :

३. कायमचा पत्ता :

४. निवडणुकीचा/नामनिर्देशनाचा दिनांक :

५. खालील दिनांकास असल्याप्रमाणे पक्ष संलग्नीकरण—

(एक) निवडणुकीच्या/नामनिर्देशनाच्या दिनांकास

(दोन) *२८ फेब्रुवारी १९८६ रोजी

(तीन) या नमुन्यावर स्वाक्षरी केल्याच्या दिनांकास

## प्रतिज्ञापन

मी, ............................................................ याद्वारे प्रतिज्ञापित करतो/करते की, वर दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे. वरील माहितीत कोणताही बदल झाल्यास, त्या प्रसंगी, मी सभापतींना तात्काळ माहिती देण्याची हमी देत आहे.

दिनांक : सदस्याची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा

*संविधान (५२ वी सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाची तारीख १ मार्च, १९८५ असल्याने त्या दिनांकापूर्वी निवडून आलेल्या किंवा नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांनी भरावयाचे.

## नमुना चार

[नियम ५ (१) पहा]

| सदस्यांचे नाव (१) | वडिलांचे/ पतीचे नाव (२) | कायम पत्ता (३) | ज्या मतदार संघातून निवडून आला असेल त्या मतदार संघाचे नाव (४) | निवडणुकीची नामनिर्देशनाची तारीख (५) | विधान परिषदेतील जागा स्वीकारण्याची तारीख (६) | पदावधीच्या प्रारंभाची तारीख (७) | तो ज्या राजकीय पक्षाचा असेल त्या पक्षाचे नाव (८) | तो ज्या विधानमंडळ पक्षाचा असेल त्या पक्षाचे नाव (९) | शेरा (१०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

## EXTRACTS OF THE CONSTITUTION OF INDIA

**Article—190. Vacation of seats.—**

(1) and (2) * * * * *

(3) if a member of House of the Legislature of a State—

(*a*) becomes subject to any of the disqualifications mentioned in clause (1) or clause (2) of Article 191 ; or

(*b*) resigns his seat by writing under his hand addressed to the Speaker or the Chairman, as the case may be, and his resignation is accepted by the Speaker or the Chairman, as the case may be,

his seat shall thereupon become vacant :

Provided that in the case of any resignation referred to in the sub-clause (*b*), if from information received or otherwise and after making such inquiry as he thinks fit, the Speaker or the Chairman, as the case may be, is satisfied that such resignation is not voluntary or genuine, he shall not accept such resignation.

(4) * * * * * *

**Article—191. Disqualification for Membership.**

(1) * * * * * *

(2) A person shall be disqualified for being a member of the Legislative Assembly or Legislative Council of a State if he is so diqualified under the Tenth Schedule.

## TENTH SCHEDULE

[Article 102 (2) and 191 (2)]

Provisions as to disqualification on ground of defection.

1. **Interpretation**—In this Schedule, unless the context otherwise requires,—

(*a*) House means either House of Parliament or the Legislative Assembly or, as the case may be, either House of the Legislature of a State ;

(*b*) ' Legislature party ', in relation to a member of a House belonging to any political party in accordance with the provisions of paragraph 2 or [1][* * *] paragraph 4, means the group consisting of all the members of that House for the time being belonging to that political party in accordance with the said provisions ;

(*c*) ' Original political party ', in relation to a member of a House, means the political party to which he belongs for the purposes of sub-paragraph (1) of paragraph 2 ;

(*d*) ' paragraph' means a paragraph of this Schedule.

2. **Disqualification on ground of defection**—(1) Subject to the provisions of [2][paragraphs 4 and 5] a member of a House belonging to any political party shall be disqualified for being a member of the House—

(*a*) if he has voluntarily given up his membership of such political party, or

(*b*) if he votes or abstains from voting in such House contrary to any direction issued by the political party to which he belongs or by any person or authority authorised by it in this behalf, without obtaining, in either case, the prior permission of such political party, person or authority and such voting or abstention has not been condoned by such political party, person or authority within fifteen days from the date of such voting or abstention.

---

[1]. The words and letters " paragraph 3 or, as the case may be," omitted by the Constitution (Ninety-first Amendment Act, 2003) sec. 5 (w.e.f. 1st January 2004).

[2]. Subs. by the Constitution (Ninety-First Amendment) Act, 2003, *sec.* 5 for "paragraph 3, 4 and 5" (w.e.f. 1st January 2004).

**Explanation**—for the purposes of this sub-paragraph—

(*a*) an elected member of a House shall be deemed to belong .to the political party, if any, by which he was set up as a candidate for election as such member ;

(*b*) a nominated member of a House shall,—

(*i*) where he is a member of any political party on the date of his nomination as such member, be deemed to belong to such political party ;

(*ii*) in any other case, be deemed to belong to the political party of which he becomes, or, as the case may be, first becomes a member before the expiry of six months from the date on which he takes his seat after complying with the requirements of Article 99 or, as the case may be, Article 188.

(2) An elected member of a House who has been elected as such otherwise than as a candidate set up by any political party shall be disqualified for being a member of the House if he joins any political party after such . election.

(3) A nominated member of a House shall be disqualified for being a member of the House if he joins any political party after the expiry of six months from the date on which he takes his seat after complying with the requirements of Article 99 or, as the case may be, Article 188.

(4) Notwithstanding anything contained in the foregoing provisions of this paragraph, a person who, I or the commencement of the Constitution (Fifty- second Amendment) Act, 1985, is a member of a House (Whether elected of nominated as such) shall,—

(*i*) where he was a member of a political party immediately before such commencement, be deemed, for· the purposes of sub-paragraph (1) of this paragraph, to have been elected as a member of such House as a candidate set up by such political party ;

(*ii*) in any other case, be deemed to be an elected member of the House who has been elected as such otherwise than as a candidate set up by any political party for the purposes of sub-paragraph (2) of paragraph or, as the case may be, be deemed to be a nominated member of the House for the purposes of sub-paragraph (3) of this paragraph.

[1][3. * * *]

**4. Disqualification on ground of defection not to apply in case of merger**—(1) A member of a House shall not be disqualified under sub- paragraph (1) of paragraph 2, where his original politic al party merges with another political party and he claims that he and any other members of his original political party,—

(*a*) have become members of such other political party or, as the case may be, of a new political party formed by such merger ; or

(*b*) have not accepted the merger and opted to function as a separate group,

and from the time of such merger, such other political party or new political party or group, as the case may be, shall be deemed to be the political party to which he belongs for the purposes of sub-paragraph (1) of paragraph 2 and to be his original political party for the purposes of this sub-paragraph.

(2) For the purposes of sub-paragraph (1) of this paragraph, the merger of the original political party of a member of a House shall be deemed to have taken place if, and only if, not less than two thirds of the members of the legislature party concerned have agreed to such merger.

**5. Exemption**—Notwithstanding anything contained in this Schedule, a person who has been elected to the office of the Speaker or the Deputy Speaker of the House of the people or the Deputy Chairman of the Council of States or the Chairman or the Deputy Chairman of the Legislative Council of a State or the Speaker or the Deputy Speaker of the Legislative Assembly of a State, shall not be disqualified under this Schedule,-

(*a*) if he, by reason of his election to such office, voluntarily gives up the membership of the political party to which he belonged immediately before such election and does not, so long as . he continues to hold such office thereafter rejoin that political party or become a member of another political party; or

(*b*) if he, having given up by reason of his election to such office his membership of the political party to which he belonged immediately before such election, rejoins such political party after he ceases to hold such office.

---

[1]. Paragraph 3 ommitted *by* the Constitution (Ninety-first Amendment) Act, 2003, sec. 5 (w.e.f. 1st January 2004).

**6. Decision on question as to disqualification on ground of defection**—(1) If any ·question arises as to whether a member of a House has become subject to disqualification under this Schedule, the question shall be referred for the decision of the Chairman or, as the case may be, the Speaker of such House and his decision shall be final :

Provided that where the question which has arisen is as to whether the Chairman or the Speaker of a House has become subject to such disqualification, the question shall be referred for the decision of such member of the House as the House may elect in this behalf and his decision shall be final.

(2) All proceedings under sub-paragraph (1) of this paragraph in relation to any question as to disqualification of a member of House under this Schedule shall be deemed to be proceedings in parliament within the meaning of Article 122 or, as the case may be, proceedings in the Legislature of a State with the meaning of Article 212.

**7. Bar of Jurisdiction of Courts**—Notwithstanding anything Contained in this Constitution, no court shall have any jurisdiction in respect of any matter connected with the disqualification of a member of a House under this Schedule.

**8. Rules**—(1) Subject to the provisions of sub- paragraph (2) of this paragraph, the Chairman or the Speaker of a House may make rules for giving effect to the provisions of this Schedule, and in particular, and without prejudice to the generality of the forgoing, such rules may provide for—

(*a*) the maintainance of registers or other records as to the political parties, if any, to which different members of the House belong;

(*b*) the report which the leader of a legislature party in relation to a member of a House shall furnish with regard to any condonation of the nature referred to in clause (*b*) of sub-paragraph (1) of paragraph 2 in respect of such member, the time within which and the authority to whom such report shall be furnished;

(*c*) the reports which a political party shall furnish with regard to admission to such political party of any members of the House and the officer of the House to whom such reports shall be furnished ; and

(*d*) the procedure for deciding any question referred to in sub-paragraph (1) of paragraph 6 including the procedure for any inquiry which may be made for the purpose of deciding such question.

(2) The rules made by the Chairman or the Speaker of a House under sub-paragraph (1) of this paragraph shall be laid as soon as may be after they are made before the House for a total period of thirty days which may be comprised in one session or in two or more successive session and shall take effect up on the expiry of the said period of thirty days unless they are sooner approved with or without modifications or disapproved by the House and where they are so approved they shall take effect on such approval in the form in which they were laid or in such modified form, as the case may be, and where they are so disapproved, they shall be of no effect.

(3) The Chairman or the Speaker of a House may, without prejudice to the provisions of Article 105 or, as the case may be, Article 194, and to any other power which he may have under this Constitution direct that any wilful contravention by any person of the rules made under this paragraph may be dealt within the same manner as a breach of privilege of the House.

# भारतीय संविधानातील उतारे

**अनुच्छेद.—१९०. जागा रिक्त करणे.**

(१) ते (२) * * * *

(३) राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहाचा सदस्य—

(क) अनुच्छेद १९१ चा खंड (१) किंवा खंड (२) यामध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही निरर्हतेस पात्र होईल तर ; किंवा

(ख) अध्यक्षाला किंवा, प्रकरणपरत्वे, सभापतीला संबोधून लिहिलेल्या स्वाक्षरित लेखाद्वारे आपल्या जागेचा राजीनामा देईल आणि अध्यक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, सभापती त्याचा राजीनामा स्वीकारील तर,

तद्नंतर त्याची जागा रिक्त होईल :

परंतु, उप खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही राजीनाम्याच्या बाबतीत, मिळालेल्या माहितीवरून किंवा अन्यथा, आणि स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर, असा राजीनामा स्वेच्छापूर्वक किंवा प्रामाणिकपणे दिलेला नाही अशी अध्यक्षांची किंवा, प्रकरणपरत्ने, सभापतीची खात्री झाली तर, तो असा राजीनामा स्वीकारणार नाही.

(४) * * * *

**अनुच्छेद.—१९१. सदस्यत्वाबाबत निरर्हता.**

(१) * * * *

(२) एखादी व्यक्ती एखाद्या राज्याच्या विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य म्हणून राहण्यास दहाव्या अनुसूचीअन्वये निरर्ह असेल तर, ती याप्रमाणे निरर्ह होईल.

## दहावी अनुसूची

### [अनुच्छेद १०२ (२) आणि १९१ (२)]

### पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होण्यासंबंधी उपबंध

**१. निर्वचन**—या अनुसूचीत, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,—

(क) " सभागृह " याचा अर्थ, संसदेचे कोणतेही सभागृह किंवा राज्याची विधानसभा किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या विधानमंडळाचे कोणतेही सभागृह असा आहे.

(ख) परिच्छेद २ किंवा [१][***], परिच्छेद ४ याच्या उपबंधानुसार कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असलेला असा जो कोणी सभागृहाचा सदस्य असेल त्याच्या संबंधात " विधानमंडळ पक्ष " याचा अर्थ, त्या सभागृहांचे जे सदस्य त्या त्या वेळी उक्त उपबंधानुसार त्या पक्षाचे असतील असे सर्व सदस्य मिळून बनलेला गट असा आहे ;

(ग) सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या संबंधात मूळ राजकीय पक्ष याचा अर्थ, परिच्छेद २ मधील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ तो सदस्य ज्या पक्षाचा असेल तो राजकीय पक्ष असा आहे.

(घ) " परिच्छेद " याचा अर्थ, या अनुसूचीचा परिच्छेद असा आहे.

**२. पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होणे**–(१) [२][परिच्छेद ४ व ५] यांतील उपबंधाच्या अधीनतेने, कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्य असलेल्या सभागृह सदस्याने,—

(क) जर अशा राजकीय पक्षाचे आपले सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिले तर ; किंवा

(ख) तो ज्या पक्षाचा आहे त्या राजकीय पक्षाकडून किंवा त्या पक्षाने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अगर प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाविरुद्ध जाऊन, जर दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत अशा राजकीय पक्षाची, व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, अशा सभागृहात मतदान केले किंवा मतदान करण्याचे वर्जिले असेल आणि अशा मतदानापासून किंवा वर्जनापासून पंधरा दिवसांच्या आत अशा राजकीय पक्षाने किंवा व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने असे मतदानाचे किंवा वर्जनाचे कृत्य क्षमापित केलेले नसेल तर ;

तो सभागृहाचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह होईल.

---

१. संविधान (एक्क्याण्णावे विशोधन) अधिनियम, २००३, कलम ५ द्वारे " परिच्छेद ३ किंवा प्रकरणपरत्वे, " हे शब्द गाळले. (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ५ द्वारे " परिच्छेद ३, ४ व ५ " या शब्दांऐवजी " परिच्छेद ४ व ५ " हे शब्द घातले. (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण**—या पोट-परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ,—

(क) सभागृहाचा निवडून आलेला सदस्य हा, त्याला ज्या पक्षाने अशा सदस्यत्वाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे केले होते त्या राजकीय पक्षाचा असल्याचे मानले जाईल ;

(ख) सभागृहाचा नामनियुक्त सदस्य हा,—

(एक) असा सदस्य म्हणून आपली नामनियुक्ती होण्याच्या दिनांकास कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असेल त्या बाबतीत, तो अशा राजकीय पक्षाचा असल्याचे मानले जाईल ;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, अनुच्छेद ९९ किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद १८८ च्या आवश्यकतांचे पालन केल्यानंतर ज्या दिनांकास स्थानापन्न होईल त्या दिनांकापासून सहा महिने संपण्यापूर्वी तो ज्या राजकीय पक्षाचा सदस्य होईल किंवा प्रकरणपरत्वे, प्रथमतः सदस्य होईल त्या पक्षाचा तो असल्याचे मानले जाईल.

(२) सभागृहाचा निवडून आलेला जो सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने नव्हे तर अन्यथा असा सदस्य म्हणून निवडून आला असेल तो अशा निवडणुकीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात सामील झाला तर, तो त्या सभागृहाचा सदस्य राहण्यास निरर्ह होईल.

(३) सभागृहाचा नामनियुक्त सदस्य अनुच्छेद ९९ किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद १८८ च्या आवश्यकतांचे पालन केल्यानंतर ज्या दिनांकास स्थानापन्न होईल त्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर तो कोणत्याही राजकीय पक्षात सामील झाला तर, तो त्या सभागृहाचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह होईल.

(४) या परिच्छेदातील मागील उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती, " संविधान (बावन्नावे विशोधन) अधिनियम, १९८५ " याच्या प्रारंभास सभागृहाचा सदस्य असेल (मग ती असा सदस्य म्हणून निवडून आलेली असो वा नामनियुक्त झालेली असो) ती व्यक्ती—

(एक) अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य असेल त्या बाबतीत, ती अशा राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने सभागृहाचा सदस्य म्हणून निवडून आलेली आहे, असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल ;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, कोणत्याही राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने नव्हे तर अन्यथा निवडून आलेला असा सभागृहाचा निर्वाचित सदस्य आहे असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (२) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल किंवा, प्रकरणपरत्वे, ती सभागृहाचा नामनियुक्त सदस्य आहे असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (३) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

[१][३. * * *]

**४. पक्षांतराच्या कारणावरून येणारी निरर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत लागू नाही-** (१) जर सभागृहाच्या एखाद्या सदस्याचा मूळ राजकीय पक्ष अन्य एखाद्या राजकीय पक्षात विलिन झाला आणि त्या सदस्याने असा दावा केला की, तो स्वतः व त्याच्या मूळ राजकीय पक्षाचे अन्य काही सदस्य,—

(क) हे अशा अन्य राजकीय पक्षाचे किंवा प्रकरणपरत्वे, अशा विलीनीकरणामुळे बनलेल्या नवीन पक्षांचे सदस्य झाले आहेत ; किंवा

(ख) यांनी विलीनीकरण स्वीकारलेले नाही व स्वतंत्र गट म्हणून कार्य करण्याचा पर्याय स्वीकारलेला आहे.

तर परिच्छेद २ च्या पोट-परिच्छेद (१) अन्वये तो निरर्ह ठरणार नाही आणि अशा विलिनीकरणाच्या वेळेपासून, असा अन्य राजकीय पक्ष किंवा नवीन राजकीय पक्ष किंवा, प्रकरणपरत्वे, गट म्हणजे तो सदस्य ज्या पक्षाचा आहे असा राजकीय पक्ष होय असे परिच्छेद २ मधील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ आणि तो त्याचा मूळ राजकीय पक्ष होय असे या पोट-परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

(२) जर सभागृह-सदस्याच्या विधानमंडळ पक्षांपैकी किमान दोन-तृतीयांश एवढ्या सदस्यांनी मूळ राजकीय पक्षाच्या विलीनिकरणास संमती दिली तर व तरच फक्त संबंधित पक्षाचे विलीनिकरण घडून आले असे या परिच्छेदातील पोट-परिच्छेद (१) च्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

**५. सूट** —या अनुसूचित काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती लोकसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अथवा राज्यसभेचा उप सभापती अथवा एखाद्या राज्याच्या विधानपरिषदेचा सभापती किंवा उप सभापती अथवा एखाद्या राज्याच्या विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्या पदावर निवडून आलेली आहे तीं व्यक्ती,—

(क) जर अशा पदावर निवडून आल्यामुळे अशा निवडणुकीच्या लगतपूर्वी ती ज्या राजकीय पक्षाची होती त्या पक्षाचे सदस्यत्व तिने स्वेच्छेने सोडून दिले आणि त्यानंतर जोवर ती असे पद धारण करीत आहे तोवर त्या राजकीय पक्षात पुन्हा सामील झाली नाही किंवा अन्य राजकीय पक्षांचा सदस्य झालो नाही तर ; किंवा

---

१. संविधान (एक्क्याण्णावे विशोधन) अधिनियम, २००३, कलम ५ द्वारे परिच्छेद ३ गाळला. (१ जानेवारी २००४ रोजी व तेव्हापासून).

(ख) अशा पदावर निवडून आल्यामुळे, अशा निवडणुकीच्या लगतपूर्वी ती ज्या पक्षाची होती त्या राजकीय पक्षाचे आपले सदस्यत्व तिने सोडून दिल्यावर जेव्हा ती असे पद धारण करण्याचेच बंद होईल तेव्हा ती अशा राजकीय पक्षात पुन्हा सामील झाली तर ;

ती या अनुसूचीअन्वये निरर्ह ठरणार नाही.

६. **पक्षांतराच्या कारणावरून येणा-या निरर्हतेसंबंधीच्या प्रश्नांचा निर्णय**– (१) सभागृहाचा एखादा सदस्य या अनुसूचीअन्वये निरर्हतेस पात्र ठरला आहे किंवा काय असा कोणताही प्रश्न उद्भवला तर, तो प्रश्न अशा सभागृहाचा सभापती किंवा, प्रकरणपरत्वे, अध्यक्ष यांच्याकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, सभागृहाचा सभापती किंवा अध्यक्ष अशा निरर्हतेस पात्र झाला आहे किंवा काय असा प्रश्न उद्भवला असेल त्या बाबतीत, तो प्रश्न या संबंधात सभागृह निवडून देईल अशा सभागृहसदस्याकडे निर्णयार्थ निर्देशित केला जाईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(२) या अनुसूचीअन्वये सभागृहाच्या एखाद्या सदस्यांच्या निरर्हतेबाबतच्या कोणत्याही प्रश्नासंबंधी या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) अन्वये केले जाणारे सर्व कामकाज म्हणजे अनुच्छेद १२२ च्या अर्थानुसार संसदेतील कामकाज होय किंवा, प्रकरणपरत्वे, अनुच्छेद २१२ च्या अर्थानुसार राज्य विधानमंडळातील कामकाज होय असे मानले जाईल.

७. **न्यायालयांच्या अधिकारीतेस आडकाठी**–या संविधानात काहीही अंतर्भूत असेल तरी, या अनुसूचीअन्वये सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या निरर्हतेशी निगडीत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाला कोणतीही अधिकारीता असणार नाही.

८. **नियम**–(१) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (२) मधील उपबंधांच्या अधीनतेने, सभागृहाचा सभापती किंवा अध्यक्ष या अनुसूचीतील उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करू शकेल, आणि विशेषतः व मागील उपबंधांच्या व्यापकतेला बाधा न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल :—

(क) सभागृहाचे वेगवेगळे सदस्य ज्या पक्षांचे आहेत असे कोणतेही राजकीय पक्ष असल्यास त्याबाबत नोंदपुस्तके किंवा अन्य अभिलेख ठेवण्यासंबंधी ;

(ख) एखाद्या विधानमंडळ पक्षाच्या नेत्याला सभागृहाच्या एखाद्या सदस्याच्या संबंधात परिच्छेद २, पोट-परिच्छेद (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केल्यानुसार अशा सदस्यांबाबत कोणतेही क्षमापन करण्याविषयी जो अहवाल द्यावा लागेल आणि असा अहवाल किती मुदतीत व कोणत्या प्राधिका-याकडे सादर करावा लागले त्यासंबंधी ;

(ग) एखाद्या राजकीय पक्षाला, सभागृहाच्या कोणत्याही सदस्यांना अशा राजकीय पक्षात प्रवेश देण्याबाबत जे अहवाल द्यावे लागतील आणि असे अहवाल संसदेच्या कोणत्याही अधिका-याकडे सादर करावे लागतील त्यासंबंधी ; आणि

(घ) परिच्छेद ६ च्या पोट-परिच्छेद (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करण्याच्या कार्यपद्धतीसंबंधी—अशा प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी जी चौकशी करण्यात येईल अशा कोणत्याही चौकशीची कार्यपद्धती धरून ;

(२) या परिच्छेदाच्या पोट-परिच्छेद (१) अन्वये सभागृहाच्या सभापतीने किंवा अध्यक्षाने केलेले नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, सभागृहापुढे एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी मांडण्यात येतील आणि तीस दिवसांचा उक्त कालावधी संपल्यानंतर ते नियम परिणामक होतील—मात्र तत्पुर्वी सभागृहाने ते आपरिवर्तनांसह किंवा त्याशिवाय मान्य केले अथवा त्याने व अमान्य केले तर गोष्ट अलाहिदा—आणि सभागृहाने ते याप्रमाणे मान्य केले तर, अशा मान्यतेनंतर ते ज्या रूपात मांडले गेले होते त्या किंवा, प्रकरणपरत्वे, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होतील आणि जर ते याप्रमाणे अमान्य करण्यात आले तर, ते मुळीच परिणामक होणार नाहीत.

(३) एखाद्या सभागृहाची सभापती किंवा अध्यक्ष, अनुच्छेद १०५ किंवा, प्रकरणपरत्वे अनुच्छेद १९४ याच्या उपबंधास आणि या संविधानाखाली त्याला जी इतर कोणतीही शक्ती असेल तिला बाधा न येता, असे निर्देशित करू शकेल की, या परिच्छेदाखाली करण्यात आलेल्या नियमांचे कोणत्याही व्यक्तीकडून हेतुपुरस्सर व्यतिक्रमण झाल्यास त्याबद्दल सभागृहाच्या विशेषाधिकार भंगाच्या बाबतीत जशी कार्यवाही करण्यात येते तशाच पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई